सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ५ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# महाराष्ट्रात एनालॉग आणि आर्टिफिशिअल (कृत्रिम) पनीरवर एक वर्षाची बंदी...

## तुकाराम मुंढेंची कठोर कारवाई; हॉटेल, रेस्टॉरंट आणि केटरर्सना वापरास मनाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई–** महाराष्ट्रातील ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठा निर्णय घेतला आहे. राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ॲनालॉग अर्थात नॉन-डेअरी पनीरच्या उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वापरावर राज्यभर एक वर्षासाठी बंदी लागू केली आहे. यासंदर्भातील आदेश अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला असून, तो अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मधील कलम ३०(२)(अ) अंतर्गत जारी करण्यात आला आहे. एफडीएच्या नियमांनुसार 'पनीर' म्हणून विकल्या जाणाऱ्या उत्पादनात दुधातील स्निग्धांश असणे अनिवार्य आहे. मात्र, दुधाऐवजी वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश किंवा इतर दुग्धेतर घटकांचा वापर करून तयार केलेले उत्पादन हे 'दुग्ध ॲनालॉग' मानले जाते. अशा उत्पादनाला पनीर म्हणून विक्री करणे किंवा ग्राहकांना पनीर म्हणून देणे कायद्याचे उल्लंघन मानले जाईल.



या निर्णयाचा परिणाम राज्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालये, क्लाऊड किचन आणि केटरिंग व्यवसायावर होणार आहे. या आस्थापनांना ॲनालॉग किंवा नॉन-डेअरी पनीर कोणत्याही खाद्यपदार्थात वापरणे, त्याचा साठा ठेवणे, विक्री करणे किंवा ग्राहकांना वाढणे पूर्णपणे बंद करण्यात आले आहे.एफडीएने स्पष्ट केले आहे की, ग्राहकांना अस्सल पनीर असल्याचा भास निर्माण करून ॲनालॉग उत्पादनांचा वापर करणे ही दिशाभूल करणारी बाब आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. संबंधित उत्पादन 'मिथ्याछापित' म्हणून जप्त करून नष्ट केले जाईल, तसेच दंडात्मक कारवाईही केली जाईल.

दरम्यान, या आदेशामुळे सर्व प्रकारच्या पनीरवर बंदी आलेली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अन्न सुरक्षा मानकांनुसार तयार करण्यात आलेले नियमित फुल-फॅट पनीर बाजारात खुल्या किंवा पॅकबंद स्वरूपात विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे. तसेच मीडियम-फॅट आणि लो-फॅट पनीरची विक्री केवळ सीलबंद पॅकेजमध्ये आणि अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व प्रदर्शन) नियम, २०२० नुसार आवश्यक माहिती नमूद करूनच करता येणार आहे.ॲनालॉग पनीर हे दिसायला साध्या पनीरसारखे असले तरी ते पूर्णपणे किंवा अंशतः वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश आणि इतर दुग्धेतर घटकांपासून तयार केले जाते. अशा उत्पादनाच्या पॅकेजिंगवर ॲनालॉग पनीर', 'ॲनालॉग चीज' किंवा 'दुग्धविरहित उत्पादन' असा उल्लेख असतो. घटकांच्या यादीत 'वनस्पती चरबी' किंवा 'हायड्रोजनेटेड तेल' असे नमूद असल्यास ते ॲनालॉग पनीर असल्याचे ओळखता येते. याशिवाय, त्याची चव आणि पोतही पारंपरिक पनीरपेक्षा अधिक तेलकट किंवा रबरासारखी जाणवते.

# हत्येतील आरोपीला तुरुंगात VIP ट्रिटमेंट!

## वाल्मिक कराडची नागपूर कारागृहात रवानगी करा, सुप्रिया सुळेंची मुख्यमंत्र्यांकडे मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई–** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी बीड जिल्हा कारागृहात असलेला मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला नियमबाह्य आणि 'व्हीआयपी' सुविधा दिल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आरोपी वाल्मिक कराडची तातडीने नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करावी आणि त्याला मदत करणाऱ्या कारागृह पोलिसांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपी वाल्मिक कराड सध्या बीड जिल्हा मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत आहे. मात्र, राजकीय प्रभावाचा वापर करून त्याला तुरुंगात सर्व सुखसोयी पुरवल्या जात असल्याचा अत्यंत गंभीर आरोप संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी कारागृह अधीक्षकांना एक सविस्तर पत्र लिहून तुरुंगातील गैरप्रकारांची पोलखोल केली आहे. याच पत्राचा संदर्भ देत खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारला धारेवर धरले आहे.

या संपूर्ण प्रकाराला 'न्यायप्रक्रियेचा थेट अपमान' ठरवत सुप्रिया सुळे यांनी



सोशल मीडियाच्या माध्यमातून राज्य सरकार आणि मुख्यमंत्र्यांकडे खालील मागण्या केल्या आहेत. बीडमधील गैरप्रकार थांबवण्यासाठी आरोपी वाल्मिक कराड याला तातडीने बीड कारागृहातून नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात हलवण्यात यावे. बीड कारागृहातील सर्व सीसीटीव्ही फुटेज, फोनचे कॉल लॉग आणि भेट नोंदवही त्वरित जप्त करून या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर सखोल चौकशी व्हावी.

एका हत्या प्रकरणातील आरोपीला राजाश्रय देणाऱ्या आणि मदत करणाऱ्या सर्व संबंधित कारागृह अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. पीडित देशमुख कुटुंबाला कोणत्याही परिस्थितीत न्याय मिळवून देणे हे आमचे प्राधान्य असून, त्यासाठी आम्ही शेवटपर्यंत आग्रही राहू, असा स्पष्ट इशाराही सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. तुरुंगातील या धक्कादायक प्रकारामुळे आता राज्याचे गृहखाते आणि कारागृह प्रशासन यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुनेत्रा वहिनींना निर्णय घेऊ द्या, इतरांनी मध्ये बोलू नये!

## शशिकांत शिंदेंचा सुनील तटकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत पक्षातील आगामी बदल, प्रवक्त्यांची भाषा आणि सुनेत्रा पवार यांच्यावरील टीकेवर सविस्तर भाष्य केले. सुनील तटकरे यांनी धनंजय मुंडे यांना दिलेल्या कानपिचक्यांचा संदर्भ देत शिंदे यांनी सुनेत्रा पवार यांच्या गटाला थेट टोला लगावला. सुनेत्रा वहिनींना स्वतः निर्णय घेऊ द्या, त्यांनी बोलायचे सोडून बाकीचे लोकच पुढे येऊन बोलत असतात, असे म्हणत त्यांनी तटकरेंना लक्ष्य केले.




काँग्रेसने सुनेत्रा पवार याच्यावर केलेल्या 'गुंगी गुडिया' या टीकेवर बोलताना शशिकांत शिंदे यांनी भूमिका मांडली. एखाद्या गृहिणीवर किंवा भगिनीवर अचानक जेव्हा मोठी राजकीय जबाबदारी येते, तेव्हा ती पेलण्यासाठी थोडा वेळ द्यावा लागतो. त्या सर्वांना सोबत घेऊन निश्चितपणे चांगले काम करतील, अशी मला अपेक्षा आहे. त्यामुळे त्यांच्यावर लगेच चर्चा करणे योग्य नाही, असे ते म्हणाले.मात्र, याच वेळी त्यांनी अजित पवार गटातील नेत्यांनाही सुनावले. सुनेत्रा वहिनींनी स्वतः निर्णय घेतले तर चांगले होईल, पण त्या घेतात आणि बाकीचे लोक मीडियासमोर जाऊन बोलतात. त्यांनी निर्णय घेण्याऐवजी इतर लोकच पुढे येतात. आपल्या नेत्याची उंची राखण्याचा प्रयत्न सर्वच नेत्यांनी करणे गरजेचे आहे, असा खोचक सल्ला त्यांनी सुनील तटकरे आणि इतर नेत्यांना दिला.

# शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या केल्या रद्द

## विद्या चव्हाण आणि महेश तपासे असतील अधिकृत प्रवक्ते

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (शरद पवार गट) पक्षाच्या प्रवक्त्यांच्या पूर्वीच्या सर्व नियुक्त्या तात्काळ प्रभावाने रद्द करून एक मोठा संघटनात्मक बदल केला आहे. पक्षाने जारी केलेल्या आदेशानुसार, हा निर्णय ४ ऑगस्ट २०२६ पासून लागू झाला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री शशिकांत शिंदे यांच्या मंजुरीनंतर जारी केलेल्या या आदेशात म्हटले आहे की, पुढील आदेश येईपर्यंत प्रवक्त्याच्या पदावरील पूर्वीच्या सर्व नियुक्त्या रद्द राहतील.



नव्या आदेशानुसार, माजी आमदार विद्या चव्हाण आणि महेश तपासे यांची पक्षाचे अधिकृत प्रवक्ते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे दोन्ही नेते आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची (शरद पवार गट) अधिकृत भूमिका माध्यमांसमोर मांडतील आणि पक्षाच्या वतीने अधिकृत निवेदने जारी करतील.

पक्षाने 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पत्र जारी केले आहे. पक्षाने आपल्या सर्व पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना नवीन आदेशाचे पालन करण्याचे आणि माध्यमांशी संबंधित बाबींमध्ये केवळ अधिकृत प्रवक्त्यांची अधिकृत विधानेच पक्षाची भूमिका म्हणून मानण्याचे निर्देश दिले आहेत. राजकीय तज्ज्ञ या निर्णयाला पक्षाची माध्यम रणनीती आणि संघटनात्मक रचना सुव्यवस्थित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानतात. गेल्या काही दिवसां पासून पक्षात अंतर्गत वक्तृत्वाची जोरदार लाट आली होती आणि आता पक्षाला त्यातूनही काहीसा दिलासा मिळेल.

# जय पवार धनंजय मुंडेंची पक्षातून हकालपट्टी करतील का?

## महिला सन्मानाचा मुद्दा सांगत म्हणत करुणा शर्मांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई–** काँग्रेस पक्षाच्या अधिकृत ट्विटरवरुन बीडमधील एका पत्रकार परिषदेतील व्हिडिओ शेअर करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करण्यात आली होती. गुंगी गुडिया अशा शब्दात काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्यांवर टीका केली, या टीकेनंतर राष्ट्रवादीने जोरदार आक्षेप घेत काँग्रेसविरुद्ध आंदोलन सुरू केलं आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून आंदोलन करत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांसह काँग्रेस नेत्यांचा निषेध केला जात आहे. तर, जय पवार यांनीही या वक्तव्याचा निषेध करत काँग्रेसला सुनावले होते. आता, करुणा शर्मा-मुंढे यांनी जय पवारांना प्रतिसवाल केला आहे.

काँग्रेसच्या नेत्यांनी सुनेत्रा पवार यांच्याबाबत वापरलेली भाषा ही केवळ एका व्यक्तीवर केलेली टीका नसून, निष्ठा, कठोर परिश्रम, जनसेवा आणि स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर समाजात मानाचे स्थान निर्माण करणाऱ्या प्रत्येक महिलेच्या सन्मानावर झालेला थेट आणि निषेधार्ह आघात आहे, अशा शब्दांत अजित पवार गटाचे नेते



जय पवार यांनी प्रतिक्रिया दिली होती. मात्र, जय पवार यांच्या याच महिला सन्मानाचा धागा पकडत करुणा शर्मा यांनी जय पवार यांना सवाल केला आहे. तसेच, धनंजय मुंडेंची पक्षातून हकालपट्टी करणार का, असा सवालही त्यांनी विचारला.

**धनंजय मुंडेंवर राष्ट्रवादी पक्ष काहीच बोलत नाही**

अजित पवार यांच्या अपघातावर सुनेत्राताई तुम्ही काहीच बोलत नाहीत. धनंजय मुंडेसारखा व्यक्ती तुम्हाला बोलण्यापासून थांबवतो तेव्हा सुद्धा तुम्ही काहीच बोलत नाहीत. ज्या धनंजय मुंडेने आपल्या बायकोवर अत्याचार केले, तिला त्रास दिला, तिला जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न केला तेव्हा सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काहीच बोलला नाही, असे म्हणत बीडमधील व्हायरल व्हिडिओ आणि काँग्रेसने केलेल्या टीकेवरुन आता करुणा शर्मा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भूमिकेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. तसेच, जय पवार यांनाही करुणा शर्मा यांनी प्रश्न विचारला आहे.

# CJP सध्या राजकीय पक्ष बनणार नाही

## दबावगटासारखे काम करू - अभिजित दिपके



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ छत्रपती संभाजीनगर**

नीट पेपरफुटी प्रकरणी जंतर-मंतरवर यशस्वी आंदोलन उभारणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या (उगझ) कोअर कमिटीची दोन दिवसीय बैठक छत्रपती संभाजीनगरमध्ये पार पडत आहे. या बैठकीपूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी देशातील सद्य राजकीय आणि न्याय व्यवस्थेवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. तसेच, देशातील विविध संस्थांची 'अकाउंटेबिलिटी' (उत्तरदायित्व) आणि 'निष्पक्षता' परत आणण्यासाठी देशव्यापी जनआंदोलनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी सुरू असलेल्या या बैठकीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे सौरव दास, यतीन गोयल , वैष्णवी गौर, रत्ना सिंग, अक्षय मराठे, अजिंक्य शिंदे आणि आशुतोष रंका हे पदाधिकारी उपस्थित आहेत.

आंदोलनाला मिळालेला पाठिंबा केवळ शिक्षण व्यवस्थेपुरता मर्यादित नव्हता, असे दीपके यांनी स्पष्ट केले. सध्या देशातील राजकीय व्यवस्था,न्यायव्यवस्था प्रसारमाध्यमे, शिक्षण व्यवस्था आणि निवडणूक आयोग यांसारख्या सर्वच महत्त्वाच्या संस्थांवरून जनतेचा विश्वास उडाला आहे. लोकांच्या मनात असलेला हा राग जंतर-मंतर, बंगाल, मुंबई आणि चेन्नईसह देशभरात दिसून आला.

सध्याच्या राजकीय परिस्थितीवर बोलताना दीपके यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आज राजकीय व्यवस्था खूपच खराब झाली आहे.

जनता सकाळी एकाला मतदान करते, मात्र संध्याकाळी भलत्याच कुणाचे तरी सरकार स्थापन होते. नागरिक ज्या पक्षाचा आमदार किंवा खासदार निवडतात, तो संध्याकाळपर्यंत दुसऱ्या पक्षात गेलेला असतो. मतदान डिलीट होण्याचे प्रकार घडतात आणि तेही नाही झाले, तर ईडी आणि सीबीआय सारख्या केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून राजकीय पक्ष फोडले जातात.

या सगळ्यामुळे जनता अत्यंत त्रस्त झाली आहे.

देशात सध्या जे काही चुकीचे घडत आहे, त्यामुळेच लोक आपली विचारधारा आणि राजकीय मतभेद बाजूला सारून एकत्र आले आहेत. भारतात आता खऱ्या अर्थाने एक 'सामाजिक चळवळ' उभी राहत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# E२० इंधनाचा वाद:नितीन गडकरींना मुंबई हायकोर्टाचा मोठा दिलासा

## बदनामीकारक AI डीपफेक व्हिडिओ आणि पोस्ट्स हटवण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई–** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि त्यांच्या कुटुंबाविरोधात सोशल मीडियावर सुरू असलेल्या बदनामीकारक मोहिमेविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. केंद्र सरकारच्या इथेनॉलमिश्रित पेट्रोल धोरणावरून गडकरी



आणि त्यांच्या कुटुंबाला लक्ष्य करणारे –ख जनरेटेड डीपफेक व्हिडिओ, बनावट फोटो आणि आक्षेपार्ह मजकूर त्वरित हटवण्याचे निर्देश न्यायालयाने मेटा, गुगल आणि एक्स सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकलपीठाने या प्रकरणावर सुनावणी करताना हा महत्त्वपूर्ण अंतरिम आदेश दिला. सोशल मीडियावर पसरवण्यात आलेला कंटेंट हा अत्यंत आक्षेपार्ह, अभद्र आणि बदनामीकारक असल्याचे स्पष्ट ताशेरे न्यायालयाने ओढले. अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेल्या विकृत कंटेंटला सार्वजनिक व्यासपीठावर कोणतेही स्थान असू शकत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने सोशल मीडिया कंपन्यांना संबंधित सर्व व्हिडिओ आणि मजकूर तातडीने हटवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, सोशल मीडियावर अशा प्रकारच्या आक्षेपार्ह मजकुरावर रोख लावण्यासाठी आधीपासूनच कोणतीही प्रभावी स्वयंचलित यंत्रणा नसल्याबद्दल न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली. अशा यंत्रणेच्या अभावामुळेच नागरिकांना आणि लोकप्रतिनिधींना न्यायालयात धाव घ्यावी लागत असल्याचे निरीक्षणही न्यायमूर्तींनी नोंदवले.

## संपादकीय ......

# सपकाळांनी ओढवून घेतलेली आफत!

*शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा सांगणार्या आणि पुरोगामित्वाचा बडेजाव मिरवणार्या महाराष्ट्राला अद्याप एक महिला मुख्यमंत्री मिळालेल्या नाहीत. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर सुनेत्रा पवार यांच्यावर पक्षाध्यक्ष आणि उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी आली. अजित पवार हयात असेपर्यंत सुनेत्रा पवार यांचा सक्रिय राजकारणाशी फारसा संबंध आलेला दिसला नाही. अजितदादांच्या अकाली निधनाच्या दु:खातून त्यांचे कार्यकर्ते अजून सावरलेले नाहीत आणि महाराष्ट्रदेखील अजून बारामतीतील विमान अपघात विसरलेला नाही. सुनेत्रा पवारांच्या उपमुख्यमंत्रीपदाला उणेपुरे वर्षही अजून झाले नाही, असे असताना महाराष्ट्र काँग्रेसने फक्त एका दृश्यामुळे महाराष्ट्राच्या पहिल्यावहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांना 'गुंगी गुडिया' म्हणणे प्रशस्त ठरत नाही.*

*बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना हुकूमशहा ठरवण्याच्या नादात काँग्रेसने आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याकांडामुळे धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद गेले. त्या प्रकरणावर विस्ताराने येथे विवेचनाची गरज नाही, मात्र या हत्याकांडानंतर फक्त बीडच नाही तर मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांचं सामाजिक आरोग्य धोक्यात आलं. जातीजातीत वितुष्ट निर्माण झालं. सामाजिक बहिष्कारासारखी परिस्थिती काहींना सहन करावी लागली, किंबहुना अजूनही करावी लागत आहे. धनंजय मुंडे यांनी अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीनिमित्तच्या कार्यक्रमात याबद्दलची खंतही व्यक्त केली. या जातीपातीच्या राजकारणामुळे आता राजकारणात राहावं की नाही, असा प्रश्न पडल्याचं त्यांनी बोलून दाखवलं. अशीच काहीशी खंत त्यांची बहीण आणि फडणवीस सरकारमध्ये मंत्री असलेल्या पंकजा मुंडेंनीही दोन दिवसांपूर्वीच व्यक्त केली.*

*सत्ता पक्षातील आमदार आणि मंत्री यांचा सत्तेत जीव रमत नाही, त्यातही जातीपातीचं राजकारण त्यासाठी कारणीभूत ठरत आहे, यामुळे महाराष्ट्र हा फक्त नावालाच पुरोगामी राहिला आहे का, याचा विचार सर्वांनीच करण्याची गरज आहे. सत्तेसाठी जाती-धर्मात भांडणं लावण्याचे राजकीय हातखंडे सर्वच पक्ष वेळोवेळी वापरत आले आहेत. त्याची झळ आता थेट मंत्री आणि आमदारांनाही बसू लागल्याचे मुंडे बहीण-भावांच्या वक्तव्यातून जाणवते. मात्र बीडमधील हुकूमशाही आणि गुन्हेगारीवरून धनंजय मुंडेंना टार्गेट करताना काँग्रेसने सुनेत्रा पवारांना 'गुंगी गुडिया' म्हणण्याचा जो अगोचरपणा केला तो महाराष्ट्राच्या राजकारणाला नक्कीच शोभणारा नाही. महाराष्ट्रात सर्वाधिक काळ काँग्रेसच सत्तेत राहिली आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा सदासर्वकाळ जप करायचा, पण क्रांती ज्योती-सावित्रीच्या लेकीला एकदा तरी राज्याचं प्रमुख करावं, हे सरंजामी मानसिकतेच्या काँग्रेस नेत्यांना कधी वाटले नाही. अपघातानं महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री झालेल्या सुनेत्रा पवारांकडून मात्र अवघ्या वर्षभरातच दुर्गेचं रुप पाहण्याची घाई झाली. पती निधनानंतर आलेलं पक्षाध्यक्षपद आणि उपमुख्यमंत्रीपद सांभाळणार्या सुनेत्रा पवारांना किमान एका पंचवार्षिकचा तरी अनुभव घेऊ द्यावा, एवढाही धीर काँग्रेसच्या प्रादेशिक नेतृत्त्वाकडे दिसत नाही.*

*महाराष्ट्र काँग्रेसच्या अधिकृत ट्विटर हँडलवरून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना 'गुंगी गुडिया' म्हणून हिणवण्यात आले. राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असलेल्या सुनेत्रा पवार यांना बीड जिल्ह्यातील गुंडगिरीवरून विचारण्यात आलेल्या प्रश्नावर त्यांच्या शेजारी बसलेले परळीचे आमदार, माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी पत्रकारांना 'आता पुरे', असे हातवारे करून बजावले, एवढंच काय ते काँग्रेसला निमित्त मिळालं. मात्र हर्षवर्धन सपकाळ आणि महाराष्ट्र काँग्रेसचे नेते विसरले की देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांना 'गुंगी गुडिया' म्हणून टोमणे मारण्यात आले होते.*

*तेव्हाचे समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांनी १९६६ ते ६७ दरम्यान इंदिरा गांधींसाठी हे शब्द वापरले होते. तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या अचानक निधनानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या होत्या. काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांच्या ऐकण्यात राहून, त्यांच्या दबावाखाली येऊन इंदिरा गांधींना सहजपणे नियंत्रणात ठेवता येईल, असा त्या काळातील अनेक ज्येष्ठ नेत्यांचा समज होता. मात्र तो त्यांच्या पंतप्रधानपदाचा प्रारंभीचा काळ होता. त्यानंतर जगानं त्यांना 'आयर्न लेडी' म्हणून गौरवलं, याचीतरी आठवण महाराष्ट्र काँग्रेसनं ठेवायला हवी होती. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ त्यांनी टीका सकारात्मक घेण्याचा आग्रह राष्ट्रवादीला केला आहे, मात्र त्यांनी सुनेत्रा पवारांना त्यांचे नेतृत्त्व सिद्ध करण्यासाठी एका सार्वत्रिक निवडणुकीपर्यंतचा तरी वेळ द्यायला काय हरकत आहे.राजकीय घराण्यात जन्मलेल्या आणि तशाच मातब्बर घरात सून म्हणून गेलेल्या सुनेत्रा पवारांना राजकीय आरोप प्रत्यारोप तसे नवीन नाहीत. मात्र त्यांना त्यांचे राजकीय व्यक्तिमत्त्व सिद्ध करण्याची संधीही काँग्रेससारख्या परिपक्व विरोधी पक्षाने देऊ नये, यात त्यांच्याच प्रादेशिक नेतृत्त्वाची अपरिपक्वता अधोरेखित होते. यासाठी दिल्लीवरून त्यांना समज दिली जाण्याची शक्यता आहेच, पण अजितदादा गेल्यानंतर पक्षातील 'आपले' कोण आणि पक्षाबाहेरील 'हितचिंतक' कोण, हे ओळखण्याची तरी संधी त्यांना दिली पाहिजे. याची पारख झाल्यानंतर त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख पाहून त्यांना एखादे विशेषण जोडण्यास हरकत नसावी, एवढंतरी स्त्रीदाक्षिण्य महाराष्ट्र काँग्रेसने दाखवण्याची गरज होती.*

# शाळेच्या शिक्षक भरतीवरून वाद

## भरती प्रक्रियेला मान्यता न देण्याची शिक्षणाधिकाऱ्यांकडे मागणी

**शाळेच्या स्थलांतरावर प्रश्नचिन्ह, प्रकरण शासनस्तरावर प्रलंबित असल्याचा दावा**

**जाहिरात व मुलाखत प्रक्रिया नियमबाह्य असल्याचा संस्थेचा आरोप**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** अमरावती येथील मनोहरराव नाईक उर्दू माध्यमिक शाळा, गुलिस्ता नगर येथे सुरू करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेवर आक्षेप घेत श्रमिक ग्रामीण बिकास संस्था, सावळी सदोबा (ता. आर्णी, जि. यवतमाळ) यांनी जिल्हा परिषद अमरावतीच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. संबंधित भरती प्रक्रियेला कोणत्याही परिस्थितीत मान्यता देऊ नये, अशी मागणी संस्थेने केली असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

संस्थेने सादर केलेल्या निवेदनानुसार, मनोहरराव नाईक उर्दू माध्यमिक शाळेचे व्यवस्थापन यापूर्वी सेवा मायनॉरिटी एज्युकेशन डेव्हलपर्स सोसायटी, अमरावतीकडे हस्तांतरित करण्यात आले होते. मात्र, शासनाच्या नियम व अटींचे उल्लंघन करून शाळेचे सावळी सदोबा येथून अमरावती येथे स्थलांतर करण्यात आले.

त्यामुळे सावळी परिसरातील उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असून शाळा हस्तांतरणाच्या मंजुरीतील अटींचेही उल्लंघन झाल्याचा आरोप संस्थेने केला आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, संबंधित शाळेच्या हस्तांतरणासह अमरावती येथे करण्यात आलेल्या स्थलांतराबाबतचे प्रकरण सध्या शासन




स्तरावर (मंत्रालयात) प्रलंबित आहे. त्यामुळे अंतिम निर्णय होईपर्यंत संस्थेला नवीन शिक्षक भरती करण्याचा कोणताही कायदेशीर किंवा प्रशासकीय अधिकार नसल्याचा दावा करण्यात आला आहे.दरम्यान, २३ जुलै २०२६ रोजी वृत्तपत्रात दोन शिक्षक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून ८ ऑगस्ट २०२६ रोजी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. शासनस्तरावर प्रकरण प्रलंबित असताना आणि भरती अधिकाराबाबत वाद सुरू असताना भरती प्रक्रिया राबविणे हे नियमबाह्य, कायद्याच्या विरोधातआणि शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन करणारे असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. शाळेचे कथित बेकायदेशीर स्थलांतर झाल्यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित बाधित झाले असल्याचेही संस्थेने नमूद केले आहे. अशा परिस्थितीत नवीन शिक्षक पदभरतीला मान्यता देणे हे सार्वजनिक हिताच्या विरोधात ठरेल, असे संस्थेचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित शिक्षक भरती प्रक्रियेला कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता देऊ नये, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी तसेच कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार संस्थेला आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनाही माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

# नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियानाचा शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.५अमरावती-** युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान' या देशव्यापी उपक्रमाचा शुभारंभआभासी पध्दतीने करण्यात आला. देशभरातील १२५ निवडक केंद्रांवर हा कार्यक्रम एकाच वेळी आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्रातील ७ केंद्रांपैकी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ब्रजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावती येथे या अभियान शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला ब्रजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. अशोक राठी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू, अमरावती जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी मनीष कुमार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अभियानाचा शुभारंभपंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पध्दतीने झाला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांनीव्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून विकसित भारताच्या उभारणीत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी युवा व खेल मंत्रालयाचे मनसुख मालविया यांनी अभियानाची उद्दिष्टे, व्यसनमुक्त भारताची संकल्पना आणि युवकांची जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवा यासाठी स्वत:ला समर्पित करावे, असे आवाहन केले.

# राष्ट्रसंतांना 'भारतरत्न'साठी गुरुदेव भक्तांचा एल्गार

## क्रांतिदिनी मुकूंद पुनसे यांच्या नेतृत्वात होणार आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४तिवसा-** देशाला ग्रामगीता, राष्ट्रभक्ती, स्वच्छता, सामाजिक समता आणि सर्वधर्म समभावाचा अमूल्य संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना आजपर्यंत देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यांत आलेला नाही, ही शोकांतिका असून यामुळे गुरुदेव भक्तांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या मागणीला आता जनआंदोलनाचे स्वरूप देण्याचा निर्धार करण्यात आला असून, येत्या ९ ऑगस्ट क्रांतीदिनाच्या पार्श्वभूमीवर तिवसातहसील कार्यालयासमोर 'क्रांतीज्योत' प्रज्वलित करून अन्नत्याग आंदोलन व साखळी उपोषणाची सुरुवात करण्यात येणार आहे. गुरुदेव भक्त तथा सामाजिक कार्यकर्ते मुकूंद पूनसे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असून, राष्ट्रसंतांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर योग्य सन्मान व्हावा, या उद्देशाने राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.



क्रांतीदिनाच्या दिवशी तिवसा तहसील कार्यालय परिसरात क्रांतीज्योत प्रज्वलित करून अन्नत्याग आंदोलनासह साखळी उपोषण सुरू करण्यात येणार आहे. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते मुकुंद पूनसे, जयकुमार बोके, रमेशराव बोके, हैबतराव गाडगे यांच्यासह शेकडो गुरुदेव भक्त सहभागी होणार आहेत. जोपर्यंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना 'भारतरत्न' जाहीर होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा ठाम निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे. आंदोलनाबाबत जिल्हा व तालुका प्रशासनाला अधिकृतरीत्या सूचना देण्यात आल्याची माहितीही आयोजकांनी दिली. यावेळी मोठ्या संख्येने गुरुदेव भक्त उपस्थित होते.

# पावसाच्या आगमनामुळे बाजारात रानभाज्यांची आवक

## नागरिकांची पावले बाजाराकडे, रानभाज्या आरोग्यास फायदेशीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अचलपूर**

पावसाचे आगमण यंदा उशिरा झाल्यामुळे नागरिकांना नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्यांची प्रतीक्षा होती. मात्र मागील आठवड्यात मेळघाटात चांगला पाऊस झाल्यामुळे शहरात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या ताज्या आणि पोषक रानभाज्या विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. झुटूलेची फुले, अंबाडीची भाजी, वाघाटे, कर्टुल्यांच्या खरेदीला सर्वाधिक पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात पाऊस पडल्यावर निसर्गतःच उगवल्या जाणाऱ्या भाज्या म्हणजे रानभाज्या. कोणत्याही प्रकारची शेती किंवा बियाणे न पेरता या रानभाज्या जंगलात, शेतजमिनीच्या कडेला, डोंगरदऱ्या, माळराने, ओढे-नाल्यांच्या काठावरील ओलसर भाग आणि नैसर्गिक परिसरात उगवतात. अशा रानभाज्या आरोग्याला पोषक असतात. पावसाळ्याच्या सुरवातीला ग्राहकांकडून रानभाज्यांना मोठी मागणी असते. मात्र यंदा पाऊस उशिराने सुरू झाल्याने रानभाज्यांचे नैसर्गिक स्रोत विकसित झालेले नव्हते. परंतु,




मागील आठवड्यात मेळघाटच्या विविध ठिकाणी चांगला पाऊस झाला. त्यामुळे रानभाज्या उगवत असून गेल्या काही दिवसांपासून शहरात विविध प्रकारच्या भाज्या बाजारात विक्रीसाठी आल्या आहेत. यामध्ये फांजीची भाजी, वाघाटे, झुटूलची फुले, अंबाडीची भाजी, जिवतीची फुले, कर्टुले आदी रानभाज्या उपलब्ध असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. या रानभाज्या २० ते ४० व ५० रुपये गंजाप्रमाणे विक्रीसाठी उपलब्ध असून नागरिकांची पाहुले खरेदीसाठी बाजाराकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.

■ या रानभाज्यांची किंमत इतर पालेभाज्यांपेक्षा जास्त असली तरी शरीरासाठी या भाज्या पौष्टिक असल्याने मोठी मागणी या रानभाज्यांना आहे या रानभाज्यांमध्ये कोणत्याही केमिकलचा वापर नसल्याने ग्राहकांचा कल या भाज्यांकडे जास्त असल्याचे पाहायला मिळत आहे. रानभाज्या ह्या जीवनसत्त्वे, लोह, कॅल्शियम, तंतुमय घटक आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहेत. पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या या भाज्यांचा संतुलित आहारात समावेश केल्यास रोगप्रतीकारशक्ती वाढण्यास, पचनक्रिया सुधारण्यास आणि रक्ताक्षयासारख्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होते. **-डॉ अनिरुद्ध वानखडे**, आयुष विभागाचे वैद्यकीय अधिकारी.

# स्कायवॉक, गाविलगड, नरनाळा पर्यटन विकासाला गती द्या

## आश्वासन समितीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांचे निर्देश




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई** विदर्भातील नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदरा येथील जगप्रसिद्ध स्कायवॉक, प्राचीन गविलगड व नरनाळा किल्ला, कर्जत एन. डी. फिल्म स्टुडिओच्या धर्तीवर चिखलदरा येथे फिल्म स्टुडिओची उभारणी आणि गोरेगाव फिल्म सिटीची पाहणी करून पर्यटन विकासाला गती देण्याचे स्पष्ट निर्दे श विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांनी दिले आहेत. मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत सन २०१५ पासून प्रलंबित असलेल्या कलावंतांच्या मानधन प्रस्तावांवर समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. अमरावतीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन १०० पात्र व गरजू कलावंतांची पडताळणी करून त्यांचे थकीत मानधन तातडीने वितरितकरण्याचे आदेश देण्यात आले. तसेच पर्यटन अँड ॲम्बेसेडर नवेली देशमुख यांनी चिखलदरा व धारणी येथे जाऊन चित्रीकरण करावे आणि सोशल मीडियाद्वारे प्रसिद्धी करून देश-राज्यात जाहिरात करावी, असे निर्देश आ. रवी राणा यांनी दिले. या बैठकीला आ. रवी राणा यांच्यासह समिती सदस्य आ. राजेश पवार, आ. समीर मेघे, आ. अनुपभय्या अग्रवाल, आ. अग्रवाल, आ. विक्रम पाचपुते, आ. कल्याणशेट्टी, आ. पराग शाह, आ. कराड, आ. किशोर पाटील, आ. अ - पाटील, आ. प्रदीप जयस्वाल, आ. सामंत, आ. हिरामण खोसकर, आ. स बनसोडे, आ.. दौलत दरोडा, आ.व सरदेसाई, आ. अमित झनक आणि वनविभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# बलदेव, अयान फूड्स, बजाज नमकीनला नोटीस, एफडीएची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती** शहर व परिसरात अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) सध्या नमकीन आणि खाद्यपदार्थांची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत एफडीएच्या पथकाने स्थानिक एमआयडीसी परिसरातील 'बलदेव' फूड' प्रॉडक्ट्स', 'बजाज नमकीन' आणि 'अयान फूड्स या तीन आस्थापनांची कसून पाहणी केली. या पाहणी अहवालाच्या - आधारे तिन्ही कारखान्यांना त्यांच्या कामकाजाच्या पद्धतीत आणि उत्पादनांच्या गुणवत्तेत आवश्यक सुधारणा करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे.एमआयडीसी येथील बलदेव फूड प्रॉडक्ट्सद्वारे, 'कमल लक्ष्मीनारायण फरसाण बेस्ट मिक्सर' नावाच्या चिवड्याचे उत्पादन केले जाते, जे अर्धा किलो आणि १० रुपयांच्या पॅकिंगमध्ये बाजारात उपलब्ध आहे. तर बजाज नमकीन या 'मयूर कारखान्याकडून नमकीन' या ब्रँडखाली विविध खाद्यपदार्थांची विक्री केली जाते. यासोबतच अयान फूड्सकडूनही वेगवेगळ्या नमकीन पदार्थांचे उत्पादन व वितरण संपूर्ण शहरात केले जाते. या तिन्ही ठिकाणी अन्न सुरक्षेच्या निकषांचे उल्लंघनआढळल्याने एफडीएने ही कठोर कारवाई केली आहे.




### शहर आणि परिसरातीळ शेकडो अनधिकृत उत्पादक;

सुरक्षेचा प्रश्न एरणीवर : शहरात या कारखान्यांव्यतिरिक्त अनेक लहान-मोठे उत्पादक शेव, गाठी, पापडी, पोंगे, खारी बुंदी, टोस्ट आणिनानकटाई यांसारख्या पदार्थांची विक्री करतात. काही उत्पादक छापील पिशव्यांवर एफएसएसएआय नोंदणी क्रमांकासह विक्री करतात, तर अनेक जण कोणत्याही माहितीशिवाय साध्या प्लास्टिक पिशव्यांमध्ये मांल विकत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# ‘पुष्पा झुकेका नहीं साला ! लेकिन ट्रेन के अंदर...’

## ‘साऊंडकास्टिंग’ बाबत मध्य रेल्वेची जनजागृती मोहीम सुरु

### प्रवासात शांतता भंग केल्यास ५०० ते १००० रु. दंडआरपीएफची कारवाईची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** सध्या मध्य रेल्वेने समाज माध्यमांद्वारे वेगळीच जनजागृती मोहीम सुरू केली आहे. बरेच प्रवासी हेडफोनशिवाय मोठ्याने गाणी ऐकतात, व्हिडिओ पाहतात, गेम खेळतात किंवा रेल्वेमध्ये स्पीकर चालू ठेवून फोनवर बोलतात. यामुळेइतर प्रवाशांना त्रास होतो. या वाईट सवयीला ‘साऊंडकास्टिंग’ म्हटले जाते. मध्य रेल्वेने प्रवाशांना रेल्वेत हेडफोन वापरण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी आकर्षक जाहिराती तयार करण्यात आल्या आहेत. एका जाहिरातीत ‘पुष्पा झुकेका नहीं साला’ या प्रसिद्ध चित्रपटातील संवादाचा वापर करण्यात आला आहे.

### काय म्हटले आहे जाहिरातीत ?

‘पुष्पा झुकेगा नहीं साला, लेकिन ट्रेन के अंदर इअरफोन जरूर पहनेगा’ असे आवाहन एका जाहिरातीतून करण्यात आले आहे. ‘समझदार बनिये, ट्रेन के अंदर इअरफोन लगाइए, सबकी यात्रा सुकून भरी बनाईए !’ असेही त्यात नमूद करण्यात आले आहे. सऱ्या एका जाहिरातीत ‘पब्लिक प्लेस है बॉस, ये ना आपका होम थिएटर नहीं..’ असा इशारा देण्यात आला नाहे. ‘थोडा आवाज कमी, थोडा सन्मान जास्त’ अशा शब्दात प्रवाशांना मोबाईलचा आवाज कमी ठेवण्याचा, हळू आवाजात बोलण्याचा सल्ला देण्यात आला आहे.रेल्वे प्रवासात अनेक जण मोठ्या आवाजात गाणी ऐकतात. काही लोक रात्री उशिरापर्यंत त्यांच्या मोबाईल फोनवर व्हिडिओ पाहत राहतात. यामुळे इतर प्रवाशांची झोप बिघडते. याबाबत भारतीय रेल्वेने स्पष्ट नियम केले आहेत. त्यानुसार कोणताही प्रवासी रेल्वेगाडीत मोठ्याने गाणी ऐकू शकत नाही किवा मोबाईलवर मोठ्याने बोलू शकत नाही.

जर तुमच्या आजूबाजूच्या प्रवाशांना तुमच्यामुळे अस्वस्थ वाटत असेल किवा त्यांना त्रास होत असेल, तर ते नियमांचे उल्लंघन मानले जाईल. विशेषतः रात्रीच्या वेळी हे नियम काटेकोरपणे लागू केले जातात.




### काय कारवाई केली जाऊ शकते ?

रेल्वे कायदा, १९८९ च्या नियमांनुसार रेल्वेगाडीमधील शांतता भंग करणे किवा इतरांना त्रास देणे हा दंडनीय गुन्हा आहे. अशा परिस्थितीत रेल्वे पोलीस (आरपीएफ) प्रवाशाला इशारा देऊ शकतात, त्याच्यावर दंड आकारू शकतात, किवा आवश्यक असल्यास त्याला कोणत्याही स्थानकावर खाली उतरवू शकतात. वेगवेगळ्याप्रकरणांमध्ये दंड ५०० ते १००० रुपये किवा त्याहून अधिक असू शकतो. याचा उद्देश प्रवाशांना शिक्षा करणे नाही, तर प्रवासादरम्यान एकमेकांची काळजी घेण्यासाठी सर्वांना जागरूक करणे आहे.

# एफडीएची कारवाई ब्लिंकेट, अजित बेकरीविरुद्ध गुन्हा

### तपासणी अहवालात धक्कादायक खुलासा

जून २०२६ मध्ये प्राप्त झालेल्या प्रयोगशाळा अहवालानुसार, ब्रेडमध्ये ९० टक्के मैदा असल्याचे स्पष्ट झाले. आरोग्यासाठी फायदेशीर समजून ‘ब्राउन ब्रेड’ खरेदी करणाऱ्या ग्राहकांची या माध्यमातून मोठी फसवणूक केली जात होती.




blinkit
India's Last Minute App

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** ऑनलाइन ग्रॉसरी प्लॅटफॉर्म ‘ब्लिंकेट’च्या माध्यमातून ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या ब्राउन ब्रेडच्या गुणवत्तेबाबत अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अत्यंत धडक कारवाई केली आहे. प्रयोगशाळेच्या तपासणीत ‘अजित ब्रँड’च्या ब्राउन ब्रेडमध्ये तब्बल ९० टक्के मैद्याचे प्रमाण असल्याचे निष्पन्न झाले आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या नियमांनुसार ब्राउन ब्रेडमध्ये गव्हाच्या पिठाचे निश्चित प्रमाण असणे अनिवार्य आहे. या प्रकरणी अमरावतीतील ब्लिंकेटची दोन केंद्रे आणि नागपूर येथील ‘अजित बेकरी’ विरुद्ध अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत न्यायालयीन कारवाई सुरू करण्यात आली आहे.

अन्न सुरक्षा विभागाला ब्लिंकेटवरून विकल्या जाणाऱ्या या ब्रेडच्या गुणवत्तेबाबत शंका आल्यानंतरअधिकाऱ्यांनी ग्राहक बनून या उत्पादनांची ऑर्डर दिली होती. प्राथमिक संशयाची पुष्टी झाल्यानंतर अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांनी ब्लिंकेट केंद्रांवर छापे मारले. तेथून अजित ब्रँड ब्राउन ब्रेडचे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठवून सुमारे ७५० रुपयांचा उर्वरित साठा जप्त केला. या कारवाईची माहिती मिळताच नागपूर एफडीएनेही चार ठिकाणी छापे मारून आवश्यक कागदपत्रे व नमुने जप्त केले.

### प्रकरण न्यायालयात दाखल

अन्न सुरक्षा कायद्याच्या कलम ५२. आणि ६६ अन्वये हे प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात अ आहे. याप्रकरणी दोषी आढळल्यास प्रत्येक आरोपीला १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे आरोग्यासाठी पोषक समजून गव्हाच्या पिठापासून तयार केलेली ब्रेड खरेदी करणाऱ्या ग्राहकांची अ प्रकारे दिशाभूल केली जात असल्याचे उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. एफडीएच्या या पावलामुळे ब्रँडेड नावाखाली नियमबाह्य खाद्यपदार्थ विकणाऱ्या कंपन्यांना मोठा इशारा मिळाला आहे.

# ब्रिटिशकालीन वारसा कोसळण्याच्या मार्गावर!

### मेळघाट पर्यटनाला जीर्ण विश्रामगृहांमुळे ग्रहण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मेळघाट** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील शासकीय वनविश्रामगृहे आज अक्षरशः अखेरच्या घटका मोजत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मेळघाटातील बहुतांश विश्रामगृहे जवळपास ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आली असून काही इमारती ब्रिटिशकालीन आहेत.

कालांतराने आवश्यक दुरुस्ती व देखभाल न झाल्यामुळे अनेक विश्रामगृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. काही ठिकाणी छत गळत आहे, तर अनेक इमारतींच्या भिंती कमकुवत झाल्याने पर्यटकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. मेळघाटातील खानापूर, बेलकुंड, ढाकणा, पोपटखेडा, रंगूबेली, कोलखास, सेमाडोह,हरीसाल, धुळघाट रेल्वे, वान आदी ठिकाणची वनविश्रामगृहे नियोजनाच्या अभावामुळे दुर्लक्षित अवस्थेत आहेत. अनेक ठिकाणी मूलभूत सुविधा नसल्याने ही विश्रामगृहे पर्यटकांना आकर्षित करण्यात अपयशी ठरत आहेत. दरवर्षी देशभरातून वन्यजीव, पक्षीनिरीक्षण आणि पर्यावरणाची आवड असलेले पर्यटक मेळघाटात येतात. मात्र जंगलाच्या सान्निध्यात राहण्यासाठी दर्जेदार व सुरक्षित निवासाची व्यवस्था उपलब्ध नसल्याने अनेक पर्यटक नाराजी व्यक्त करीत आहेत. पर्यावरण पर्यटनाला चालना देण्यासाठी अशी विश्रामगृहे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, मात्र त्यांच्या दयनीय अवस्थेमुळे मेळघाटाची पर्यटन क्षमता पूर्णपणे वापरली जात नसल्याची खंत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. निसर्गसंपन्न आणि जैवविविधतेने समृद्ध असलेल्या मेळघाटात आधुनिक सुविधांनी सुसज्ज, पर्यावरणपूरक विश्रामगृहे उभारल्यास देश–विदेशातील पर्यटक या ठिकाणी येऊ शकतात.



### वनविश्रामगृहांचे नूतनीकरण कधी ? कोट्यवधींचा व्याघ्र प्रकल्प, पण विश्रामगृहांकडे दुर्लक्ष

खानापूर वन विश्रामगृहात पाणी व वीज व्यवस्था नसल्याने ते सध्या पर्यटकांसाठी सुरू करता येत नाही. आवश्यक सुविधा उपलब्ध करून ते लवकरच सुरू करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्यात ये येईल. **– मनोज चौधरी,** (वनपरिक्षेत्र अधिकारी, ढाकणा.

# मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम बंद

### नेहरू मैदानात जमा... मोठी घटना घडण्याची महापालिकेला प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

शाळकरी बालिकेवर कुत्र्याने हल्ला केल्यानंतर महापालिकेने युद्धपातळीवर मोकाट कुत्रे पकडण्याची युद्धपातळीवर सुरू केलेली मोहीम थंडावली आहे. १७ जुलै ते ४ ऑगस्ट, या कालावधीत ४१३ मोकाट कुत्रे पकडण्यात आल्याची माहिती पशुवैद्यक विभागाकडून देण्यात आली असली तरी शहरात २५ हजारांवर मोकाट कुत्र्यांची संख्या असल्याची माहितीही याच विभागाने यापूर्वी दिली आहे. घटना घडल्यावर ॲक्शन मोडवर येणारी यंत्रणा आता मात्र सुस्तावलेली आहे व श्वानदंशाच्या घटना घडतच आहेत. अंबागेटच्या जवळ



मंगळवारी पुन्हा अशीच घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.

रुक्मिणीनगर परिसरात १६ जुलैला दहा वर्षीय शाळकरी मुलीवर मोकाट कुत्र्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली होती. त्यावेळी या घटनेने समाजमन संतप्त झाले होते व महापालिकेच्या विरोधात रोष उफाळला होता. महापालिकेने तातडीने ॲक्शन मोडवर येत युद्धपातळीवर मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी त्यांना पकडण्याची मोहीम हाती घेतली. प्रारंभी या कारवाईने समाजमन शांत झाले. त्यानंतर मात्र यंत्रणा सुस्तावली. मोकाट कुत्रे पकडण्यासाठी पाच वाहने व कर्मचारी, असा ताफा तैनात करण्यात आला आहे. हल्ली ही पथके नेहरू मैदानात दिवसभर विश्रांती घेत असल्याचे चित्र आहे.

१७ जुलै ते ४ ऑगस्ट, या कालावधीत या पाचही पथकांनी ४१३ मोकाट कुत्रे पकडल्याची माहिती पशुवैद्यक विभागाने विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांना दिली. या कुत्र्यांना सुकळी कंपोस्ट डेपो, भानखेडा या भागात सोडून देण्यात असल्याचेही सांगण्यात आले. शेल्टर हाउसमध्ये काही कुत्र्यांना ठेवण्यात आले, त्यावर प्राणी मित्रांकडून आक्षेप घेण्यात येत असल्याचे सांगण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, मंगळवारी मोकाट कुत्र्याने एकास चावा घेतल्याची घटना अंबागेट परिसरात घडल्याने पशुवैद्यक विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह लागले आहे. ही यंत्रणा सुस्तावल्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### पशुवैद्यक अधिकारी नाही

महापालिकेच्या पशुवैद्यक विभागास पूर्णवेळ कायमस्वरूपी पशुवैद्यक अधिकाऱ्याची गरज आहे. मध्यंतरी या पदावरील अधिकारी फौजदारी प्रकरणात अडकल्याने रिक्त जागेवर मनपा प्रशासनाने बीएएमएस अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. या पदावर सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक असतानाही प्रशासनाने मात्र त्यादृष्टीने कोणतेही पाऊल उचलले नाही. परिणामतः विद्यमान अधिकाऱ्यास मर्यादा येत असून काम करणे कठीण झाले आहे.

### मोर्शी पोलिसांची धडक कारवाई

# घरामागे लावलेली गांजाची ५ झाडे जप्त



### एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मोर्शी** मोर्शी पोलीस ठाण्याच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवारी (ता. चार) एका व्यक्तीने घरामागे लावलेली गांजीची पाच झाडे जप्त. केली.

अनिल रामजी पंधरे (वय ३७ वर्षे, रा. वॉर्ड क्र. १५, गाडगेनगर, मोर्शी) याने राहत्या घराच्या पाठीमागे गांजाची लागवड केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार राजपत्रित अधिकारी, पंच व न्यायसहायक वैज्ञानिक पथक यांच्या उपस्थितीत छापा टाकून झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान घराच्या पाठीमागे लावलेली एकूण ५ गांजाची झाडे आढळून आली. सदर झाडे पंचनामा करून जप्त करण्यात आली. न्यायसहायक वैज्ञानिक पथकाने प्राथमिक तपासणीमध्ये जप्त झाडे गांजाची असल्याचे निष्पन्न केले.

या प्रकरणी अनिल पंधरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पो–लीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालीपोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, अथर्व कोहळे इतर पोलीस कर्मचारी व तपास पथक राजपत्रित अधिकारी न्यायसहायक वैज्ञानिक पथक यांनी ही कारवाई केली.

### आ.प्रवीण पोटे यांच्या सूचनेनुसार

# आता फेरीवाल्यांना मिळणार नवी ओळख

### शहरात ‘वन क्लिक बारकोड’ सिस्टीम लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** ‘अमरावती शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे, नागरिकांची सुरक्षा वाढवणे आणि फेरीवाल्यांची पारदर्शक ओळख पटवणे या उद्देशाने अमरावती महानगरपालिका क्षेत्रात ‘वन क्लिक बारकोड सिस्टीम’ लागू करण्याची तयारी सुरू झाली आहे. या नव्या प्रणालीमुळे अधिकृत फेरीवाल्यांची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.



शहर परिसरात हजारो हातगाडी चालक आणि स्ट्रीट फूड विक्रेते आपला व्यवसाय करतात. मात्र, अनियोजित व्यवसायामुळे अनेकदा वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातांचा धोका वाढतो. यावर तोडगाम्हणून आमदारांच्या सूचनेनुसार मनपा प्रशासनाने ही डिजिटल धोरण योजना तयार केली आहे.या प्रणालीमुळे शहरातील सर्व अधिकृत फेरीवाल्यांची डिजिटल नोंद उपलब्ध होणार असल्याने विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या अवैध फेरीवाल्यांची ओळख पटवणे सोपे होईल. यामुळे शहरांमधील अतिक्रमणावर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल.या प्रस्तावाला अंतिम रूप देण्यासाठी ७ऑगस्ट रोजी अमरावती महानगरपालिकेत महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला लोकप्रतिनिधी, मनपा आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. फेरीवाल्यांचा रोजगार सुरक्षित ठेवून शहराची वाहतूक सुलभ आणि सुरक्षित करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.प्रत्येक अधिकृत फेरीवाल्याचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, परवाना आणि इतर तपशील ऑनलाइन डेटाबेसमध्ये नोंदवले जातील.फेरीवाल्याच्या गाड्यावर किंवा टपरीवर एक युनिक बारकोड स्टिकर लावला जाईल.ग्राहक किंवा नागरिक मोबाईलवरून हा बारकोड स्कॅन करून विक्रेत्याची अधिकृत माहिती पाहू शकतील. तसेच खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या बाबतीत कच्च्या मालाचा दर्जा व इतर तपशीलही उपलब्ध केला जाईल.

# आयुष्यमान आरोग्य मंदिराचा परिसर जलमय

### पथ्रोट येथील रुग्णांच्या सोयीकरिता हवी कायमस्वरूपी व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५पथ्रोट** येथील आयुष्यमान आरोग्य मंदिराच्या आतील परिसर हा पूर्णतः जलमय झाल्याने त्याठिकाणी प्रचंड चिखल साचला आहे. तेथून वाट काढताना रुग्णांसह आरोग्य कर्मचारी व अधिकाऱ्यांना खूपच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अशावेळी त्याठिकाणी कायमस्वरूपी रस्त्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तोपर्यंत ग्रामपंचायतने मुरूम टाकून सुविधा करून देण्याची मागणी होत आहे. ८० हजार लोकसंख्येचा भार सांभाळणाऱ्या आयुष्यमान आरोग्यमंदिरात दररोज तीनशे रुग्णांच्या जवळपास ओपीडी संख्या असते. एवढेच नव्हे तर कुटुंब शस्त्रक्रियेचे रुग्णसुद्धा मोठ्या संख्येने दाखल असतात. मग अशावेळी त्यांची देखभाल करण्यासाठी तेवढ्या संख्येने त्यांचे नातेवाईक सुद्धा त्याठिकाणी मुक्कामी राहतात. रुग्णांच्या दोन वेळच्या जेवणाच्या सोयीसाठी गावातील दानशूर व आरोग्ययंत्रणेच्या संयुक्त विद्यमाने आहार समितीमार्फत त्यांना विनामूल्य भोजन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.



ज्याठिकाणावरून ही व्यवस्था राबविल्या जाते, त्याठिकाणापर्यंत पोहोचताना आयुष्यमान आरोग्य मंदिराच्या आतील परिसरात साचलेल्या चिखलातूनच नातेवाइकांना वाट काढावी लागते. याशिवाय दैनंदिन तपासणीकरिता येणाऱ्या गरोदर माता, रात्री–बेरात्री प्रसूतीकरिता येणाऱ्या माता तसेच महामार्गावर असलेल्या या मंदिरात अपघातातील रुग्णांची निगा व काळजी घेतानासुद्धा मोठा त्रास सहन करावा लागतो. या परिसरात खासदार निधीतून पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. परंतु त्यावरून एक वर्षाहून अधिकचा कालावधी निघून गेला तरी सुद्धा सदर कामाला मुहूर्त लागलेला नाही. प्रशासकीय कार्यकाळ सुरू असल्याने ग्रामपंचायतला निधी खर्च करण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. अशावेळी जोखीमेची तथा तातडीची रुग्णसेवा देणाऱ्या ठिकाणी तरी ग्रामपंचायतला मुरूम टाकून तात्पुरती स्वरूपात ये–जा करण्याची व्यवस्था करून देण्याची परवानगी वरिष्ठ कार्यालयाने द्यावी, अशी मागणी सर्वच स्तरातून करण्यात आलेली आहे.

परिसरात पेव्हर ब्लॉक नसल्याने चिखल होतो आणि कालांतराने शेवाळ तयार होते. त्यामुळे रुग्णांना तसेच कर्मचाऱ्यांना दिवसा व रात्री कसरत करावी लागते. तोल सांभाळत चिखलातून वाट काढावी लागते. अशावेळी या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविल्यास सदरची अडचण दूर होऊन शकते. **–डॉ. सचिन गोळे** वैद्यकीय अधिकारी, आयुष्यमान आरोग्य मंदिर, पथ्रोट.

# महापालिकेचा मनुष्यबळ पुरवठ्याचा कंत्राट गुलदस्त्यात

### स्थायीच्या मंजुरीनंतरही करारनाम्यास प्रशासनाकडून संशयास्पद विलंब

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

महापालिकेच्या विविध विभागांना कंत्राटी तत्त्वावर मनुष्यबळ पुरविण्यासाठी निवड करण्यात आलेल्या संस्थेसोबत करारनामा प्रशासन का करीत नाही, या प्रश्नाने महापालिकेत सध्या चांगलेच वातावरण गरम झाले आहे. स्थायी समितीने गेल्या सप्ताहात या संस्थेसोबत करारनामा करण्यास मंजुरी दिली आहे. मात्र यासंदर्भातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयात असून न्यायालयाने स्थगिती दिल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यावर स्पष्टता मात्र नाही. त्यामुळे याविषयावर महापालिकेत गोंधळाचे व संभ्रमाचे वातावरण आहे. बाह्य स्रोतांमार्फत कंत्राटी तत्त्वावर मनुष्यबळ पुरवठ्यासाठी मनपा प्रशासनाने प्रशासकीय राजवटीत निविदाप्रक्रिया करण्यात आली. एका संस्थेला त्यासाठी पात्र ठरविण्यात आले, त्यावर प्रतिस्पर्धी संस्थेने आक्षेप घेत न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महापालिकेने केलेली निविदाप्रक्रिया योग्य असल्याचा



निवाळा दिला व पुढील कारवाईसाठी मार्ग मोकळा झाला. स्थायी समितीने या निवाड्याच्या आधारे संबंधित संस्थेसोबत करारनामा करण्यासाठी मनपा प्रशासनाला मंजुरी प्रदान केली. मात्र त्यास एक आठवड्याचा कालावधी उलटल्यानंतरही करारनामा करण्यात न आल्याने संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाला प्रतिस्पर्धी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून त्यावरील सुनावणी आटोपली असल्याचे व महापालिकेच्या निविदाप्रक्रियेस समोर नेण्यावर स्थगिती देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. तथापि, या आदेशाची पुष्टी प्रशासनासह स्थायी समिती सभापतींसह पदाधिकाऱ्यांनी केलेली नाही. विधी अधिकाऱ्यांनीही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशासंदर्भात स्पष्ट माहिती मिळाली नसल्याचे सांगितले असून आदेशाची प्रत मिळालीच नसल्याने यावर बोलण्यास असमर्थता दर्शविली आहे. दरम्यान, स्थायी समितीने करारनामा करण्यास मान्यता दिल्यानंतरही प्रशासनाकडून तो का करण्यात येत नाही, यावर प्रश्न उपस्थित झाले आहे.

**६१ कोटींची होती निविदा**

२४महापालिकेस बाह्ययंत्रणेमार्फत ६२५ मनुष्यबळ पुरविण्यासाठी ६१ कोटी रुपयांची तीन वर्षांसाठीच्या कंत्राटाची निविदा प्रशासनाने काढली होती.

# मुथूट गोल्ड लोन शाखेत ग्राहकांचा हंगामा

## १२ ग्राहकांची कोतवाली पोलीस ठाण्यात लेखी तक्रार

**ऑडिट अहवालानंतर पुढील कारवाई होणार**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** मोठ्या संख्येने ग्राहक त्यांचे गहाण ठेवलेले सोन्याचे दागिने परत घेण्यासाठी आले असता शहरातील बस डेपो रोडवरील मुथूट फिनकॉर्प गोल्ड लोन शाखेत मंगळवारी जोरदार हंगामा झाला. ग्राहकांचा आरोप आहे की, कर्जाची संपूर्ण रक्कम आणि व्याज भरूनही कंपनी त्यांचे गहाण ठेवलेले दागिने परत करत नाही. या संपूर्ण प्रकरणात लाखो रुपयांच्या गोल्ड लोन घोटाळ्याचा संशय व्यक्त केला जात आहे. ग्राहकांचा वाढता संताप पाहता, शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयातच थांबले. माहिती मिळाल्यानंतर, या प्रकरणाची तक्रार शहर कोतवाली पोलीस ठाण्यात करण्यात आली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी शाखेचे एरिया मॅनेजर आणि इतर कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी ठाण्यात नेले. त्यानंतर, मोठ्या संख्येने संतप्त ग्राहक त्यांच्या तक्रारी घेऊन कोतवाली पोलीस ठाण्यात पोहोचले.

प्राप्त माहितीनुसार, झालेल्या गोंधळानंतर मंगळवार संध्याकाळपर्यंत १२ ग्राहकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात लेखी तक्रारी दाखल केल्या होत्या. सुरुवातीला, शाखा व्यवस्थापकाने लाखो रुपयांचा अपहार करून पलायन केल्याच्या अफवा पसरल्या होत्या. तथापि, पोलिसांनी एरिया मॅनेजर, अतिश राजेंद्र धोते (४१, रहाटगाव रोड) आणि इतर कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना पोलीस ठाण्यात बोलावले. एरियामॅनेजरने पोलिसांना माहिती दिली की, शाखेचे संपूर्ण ऑडिट केले जात असून, ऑडिट अहवाल बुधवारी पोलिसांना




सादर केला जाईल. पोलिसांनी सांगितले की, ऑडिट अहवालाची तपासणी केल्यानंतरच कोणतीही आर्थिक अनियमितता किवा अपहार झाला आहे की नाही हे स्पष्ट होईल. तपास पूर्ण झाल्यावर, ग्राहकांच्या तक्रारींच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.

ग्राहकांचे गंभीर आरोपतक्रारदार श्याम अशोकराव देहणकर यांनी पोलिसांना दिलेल्या अर्जात म्हटलेआहे की, त्यांनी मे २०२६ मध्ये अंदाजे ५ ते ६ ग्रॅम सोने गहाणठेवून ४३,००० रुपयांचे सुवर्ण कर्ज घेतले होते. त्यांनी व्याजासह संपूर्ण रक्कम निर्धारित मुदतीपूर्वीच परत केली. असे असूनही, कंपनीने त्यांचे सोने परत केले नाही. त्यांचा आरोप आहे की, त्यांच्याकडे पावती आणि बँकेची कागदपत्रे असूनही, 'पेमेंटसिस्टीममध्ये दिसतनाही' असे सांगूनकर्मचारीपैसे देण्यास विलंब करत राहिले. दुसरे तक्रारदार, आशिष चंद्रप्रकाश क्षीरसागर यांनी सांगितले की, त्यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये १९.४ ग्रॅम सोने गहाण ठेवून १,९५,००० रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यांनी ३० जुलै रोजी अंदाजे २,२०,००० रुपये रोख आणि ऑनलाइन जमा केले. तथापि, कंपनीने पैसे मिळाल्याचे नाकारले. तक्रारीत असा आरोप आहे की, शाखा कर्मचारी शुभम वसेवाय फरार असून या संपूर्ण प्रकरणात कर्मचाऱ्यांची भूमिका संशयास्पद आहे.

### लेखापरीक्षण अहवालानंतर कारवाई

पोलिसांनी सर्व तक्रारींची नोंद करून तपास सुरू केला आहे. बँकेची कागदपत्रे, पेमेंट रेकॉर्ड, सीसीटीव्ही फुटेज, संगणक प्रणाली आणि लेखापरीक्षण अहवाल तपासल्यानंतरच हे प्रकरण तांत्रिक बिघाड आहे की ग्राहकांची फसवणूक आहे, हे स्पष्ट होईल. तपासादरम्यान अनियमितता उघडकीस आल्यास, जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. यानंतर, पुढील तपासासाठी हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवले जाऊ शकते.–

# मोफत योजनांचा ग्रामीण रोजगारावर परिणाम

## ग्रामीण भागात शेतीसाठी मजुरांची तीव्र टंचाई

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



ग्रामीण भागात शेतीकामासाठी मजुरांची तीव्र टंचाई निर्माण झाली असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. सरकारच्या विविध मोफत योजनांमुळे गरजू नागरिकांना आर्थिक दिलासा मिळत असला, तरी त्याचवेळी शेतीकामासाठी मजूर मिळणे कठीण झाल्याची तक्रार अनेक शेतकरी करत आहेत. परिणामी पेरणी, लागवड, निंदणी, खुरपणी आणि कापणीसाठी शेतकऱ्यांना बाहेरगावाहून मजूर आणावे लागत असून शेतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.पूर्वी गावात सहज उपलब्ध होणारे शेतीमजूर आता मिळेनासे झाले आहेत. काही शेतकऱ्यांच्या मते, घरबसल्या मिळणारे विविध शासकीय लाभ, मोफत धान्य आणि इतर योजनांमुळे कष्टाच्या शेतीकामाकडे काहींचा कल कमी झाला आहे. त्यामुळे रोपलावणीसारख्या कामांसाठी प्रतिदिन २०० रुपयांपेक्षा अधिक मजुरी द्यावी लागत असूनही मजूर उपलब्ध होत नाहीत.दरम्यान, मजुरांच्या टंचाईबरोबरच अवकाळी पाऊस, दुष्काळ, खतांच्या वाढलेल्या किमती आणि बोगस बियाण्यांच्या समस्येमुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. एकरी २० ते २५ हजार रुपयांपर्यंत खर्च करूनही उत्पादनाची खात्री नसल्याने अनेक शेतकरी कर्जबाजारी होत आहेत.शेतकरी संघटनांच्या मते, या परिस्थितीवर मात करण्यासाठी कृषी यांत्रिकीकरणाला चालना, शेतीसाठी अनुदान, स्वस्त खते, दर्जेदार बियाण्यांचा पुरवठा आणि शेतीमजुरांची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रभावी धोरण राबविण्याची गरज आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात , अशी मागणी होत आहे.

# 'एफडीए'च्या कारवाईने रंग उडाला

## पिवळा गूळ बाजारातून गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** : साखरेला पर्याय म्हणून वापरल्या जाणाऱ्या गुळामध्ये रंग आणण्यासाठी काही उत्पादकांकडून घातक रसायने आणि सोडियम हायड्रोसल्फाइटचा बेकायदेशीर वापर होत असल्याचे प्रकार समोर आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) धाडसत्र सुरू केले. या कारवाईचा परिणाम आता बाजारपेठेत स्पष्टपणे दिसून येत असून, रसायनयुक्त पांढरा व पिवळसर गूळ जवळपास गायब झाला आहे. त्याऐवजी रसायनमुक्त, नैसर्गिक रंगाचा गूळ मोठ्या प्रमाणावर विक्रीस उपलब्ध होत आहे.भेसळयुक्त गुळाच्या सेवनामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनीही विशेष खबरदारी घेत रसायनविरहित गुळाचीच विक्री सुरू केली आहे. सणासुदीच्या काळात केशरी किंवा पिवळसर गुळाला ग्राहकांची अधिक पसंती असायची; मात्र आता रंगीत गूळ





बाजारात मिळणे कठीण झाले असून नैसर्गिक रंगाच्या गुळाची मागणी वाढली आहे.

**भेसळ आढळल्यास शिक्षा**

गुळामध्ये आरोग्यास घातक रसायने आढळल्यास संबंधितांवर गंभीर गुन्हा दाखल होऊ शकतो. अशा प्रकरणांमध्ये कारावासासह १ लाख ते १० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. तसेच अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन किंवा भेसळ सिद्ध झाल्यास ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

**रंगासाठी कोणती रसायने वापरली जातात ?**

काही उत्पादक गुळाचा रंग अधिक उजळ व आकर्षक दिसण्यासाठी सोडियम हायड्रोसल्फाइट, सल्फर डायऑक्साइड, कृत्रिम रंग, साखर तसेच धुण्याचा सोडा यांचा वापर करतात. ही रसायने आरोग्यास अपायकारक ठरू शकतात. त्यामुळे ग्राहकांनी नैसर्गिक रंगाचा आणि विश्वासार्ह ठिकाणाहून गूळ खरेदी करण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

# बोगस जातवैधता प्रमाणपत्रांवर सरकारचा कडक बडगा

## दोषींवर गुन्हे, कुटुंबीयांच्या प्रमाणपत्रांचीही फेरतपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** राज्यात बनावट कागदपत्रे किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचा गैरवापर करून जातवैधता प्रमाणपत्र मिळविणाऱ्यांविरोधात राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणांनुसार, अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींवर थेट फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असून, ५० हजार रुपयांपर्यंत दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे. तसेच, तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर २० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद असल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.गेल्या काही वर्षांत खोट्या कागदपत्रांच्या आधारे जातवैधता प्रमाणपत्र मिळविण्या चे प्रकार वाढल्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि




इतर मागासवर्गीय समाजातील पात्र लाभार्थ्यांच्या हक्कांवर गदा येत होती. या पार्श्वभूमीवर शासनाने कायद्यात सुधारणा करून बनावट प्रमाणपत्र धारकांवर कठोर कारवाईचा मार्ग मोकळा केला आहे. या निर्णयाचे विविध आदिवासी संघटनांनी स्वागत केले असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही केली आहे.नवीन नियमांनुसार एखाद्या व्यक्तीचे जातवैधता प्रमाणपत्र बनावट अथवा अवैध आढळल्यास त्याच्या कुटुंबातील रक्ताच्या नात्यातील सदस्यांच्या प्रमाणपत्रांचीही फेरतपासणी केली जाणार आहे. आवश्यकतेनुसार ती प्रमाणपत्रे रद्द करण्याची कारवाईही केली जाईल. यामुळे बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे लाभ घेण्याचे प्रकार रोखण्यास मदत होणार असून, पात्र लाभार्थ्यांना आरक्षण व शासकीय योजनांचा लाभ अधिक पारदर्शक पद्धतीने मिळेल.याशिवाय, तांत्रिक त्रुटी किंवा पुराव्यांच्या अभावामुळे एखाद्या प्रामाणिक अर्जदाराचा अर्ज नामंजूर झाल्यास त्याला वरिष्ठ प्राधिकरणाकडे नियमानुसार अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

# हनुमान चालीसा प्रकरण नवनीत राणा व रवी राणा मुंबई सत्र न्यायालयात हजर

## पुढील सुनावणी २४ ऑगस्टला उपमथळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



हनुमान चालीसा प्रकरण आणि त्यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या राजद्रोहासह विविध गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा बुधवारी मुंबई जिल्हा व सत्र न्यायालयात प्रत्यक्ष हजर झाले. न्यायालयीन प्रक्रियेस पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका कायम असून भारतीय न्यायव्यवस्थेवर संपूर्ण विश्वास असल्याचे दोन्ही नेत्यांनी यावेळी स्पष्ट केले.

सुनावणीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना आमदार रवी राणा यांनी सांगितले की, या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून न्याय मिळावा यासाठी उच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात येणार आहे. न्यायालय जो निर्णय देईल, त्याचा आदर केला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.या प्रकरणाची पार्श्वभूमी २०२२ मधील आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानाबाहेर हनुमान चालीसा पठण करण्याची घोषणा केल्यानंतर तत्कालीन राज्य सरकारने नवनीत राणा आणि रवी राणा यांच्याविरुद्ध राजद्रोहासह विविध कलमांखाली गुन्हे दाखल केले होते. त्यानंतर दोघांना अटक करण्यात आली होती आणि सुमारे १४ दिवस न्यायालयीन कोठडीत राहावे लागले होते.याच प्रकरणातील पुढील सुनावणीसाठी आज दोन्ही नेते न्यायालयात उपस्थित राहिले. न्यायालयीन प्रक्रियेस पूर्ण सहकार्य करत कायदेशीर मार्गाने लढा सुरू ठेवणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

# बेलोरा विमानतळावर आढळला भला मोठा अजगर

## सर्पमित्राच्या तत्परतेने सुरक्षित रेस्क्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** : बेलोरा विमानतळ परिसरात भला मोठा अजगर आढळल्याने काही काळ खळबळ उडाली. विमानतळाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून काही अंतरावर असलेल्या झाडामध्ये हा अजगर दडून बसलेला असल्याचे निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाले.सर्पमित्रांनी अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षित पद्धतीने अजगराचे रेस्क्यू केले. कोणतीही जीवितहानी किंवा अनुचित प्रकार घडू न देता अजगराला ताब्यात घेण्यात आले. रेस्क्यूनंतर वन्यजीव संरक्षणाच्या नियमांचे पालन करत अजगराला त्याच्या नैसर्गिक अधिवासातील जंगल परिसरात सुरक्षितपणे सोडण्यात आले.

या घटनेमुळे विमानतळ परिसरात काही काळ उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे परिस्थिती लवकर नियंत्रणात आली. वन्यजीव आढळल्यास नागरिकांनी घाबरून न जाता किंवा त्याला इजा करण्याचा प्रयत्न न करता तात्काळ वनविभाग किंवा प्रशिक्षित सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिखलदऱ्यात मूलभूत सुविधांचा बोजवारा

## पर्यटकांकडून पार्किंगच्या नावाखाली पठाणी वसुली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ चिखलदरा** विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण असलेल्या चिखलदऱ्यात पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी होत असताना मूलभूत सुविधांचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. पर्यटकांकडून पार्किंगच्या नावावर पैसे घेऊनही पार्किंगच्या ठिकाणी चिखल, पाणी आणि गटारांची दुरवस्था असल्याने वाहनधारकांना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. त्यामुळे चिखलदऱ्यात पर्यटनाच्या नावाखाली सुविधा देण्याऐवजी कथित वसुली सुरू आहे का, असा सवाल पर्यटक करीत आहेत.

विशेष म्हणजे, नगरपरिषदेच्या एका पदाधिकाऱ्याच्या शेतातच वाहने पार्किंग करण्यासाठी बॅरिकेट्स लावण्यात आल्याचे सांगण्यात येत असून, वाहनधारकांना पर्यायी जागेवर पार्किंग करण्यापासून कथितरीत्या रोखले जात असल्याचा आरोप आहे. काही स्थानिकांच्या



म्हणण्यानुसार, वाहनधारक व पर्यटकांवर 'आम्ही सांगतो त्याच ठिकाणी पार्किंग करा' असा दबाव टाकला जात आहे. या प्रकारामुळे पर्यटकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, पार्किंग व्यवस्थेच्या नावाखाली कोणाचा आर्थिक फायदा होत आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. पार्किंगच्या आजूबाजूला आदिवासी बांधवांची शेती असतानाही त्यांना सुद्धा रोजगार उपलब्ध होऊ शकतो. पण, हेतुपुरस्सर पार्किंग २ किलोमीटर दूर का, अशी चर्चा होत आहे. दुसऱ्या दिशेने वाहन घेऊन जाण्यास मज्जाव केला जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. पण याकडे तेथील पोलिस प्रशासनाचे सुद्धा दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. या रकमेची अधिकृत पावती पर्यटकांना दिली जाते का? जमा होणाऱ्या रकमेचा हिशेब कोण ठेवतो? ती रक्कम नगरपरिषदेच्या खात्यात जमा होते की अन्य कोणत्या पद्धतीने तिची वसुली केली जाते? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने स्पष्ट करणे गरजेचे आहे.

### प्रशासनाचे चिखलदऱ्याकडे दुर्लक्ष

चिखलदऱ्यात पर्यटनावर हॉटेल व्यावसायिक, छोटे दुकानदार, वाहनचालक, स्थानिक विक्रेते आणि अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. पर्यटकांची संख्या वाढत असताना त्यांना स्वच्छता, पार्किंग, वाहतूक नियोजन, पिण्याचे पाणी आणि इतर मूलभूत सुविधा मिळणे अपेक्षित आहे. मात्र, पार्किंगच्या नावाखाली शुल्क आकारूनही सुविधा मिळत नसतील तर पर्यटकांनी जायचे कशाला, असा प्रश्न विचारला जात आहे.